# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२३-२४/४२६

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२३-२४ मधील

## दिनांक २५ मार्च, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची एकविसावी सभा बुधवार दिनांक २५ मार्च, २०२४ रोजी दुपारी ४:०० वाजता आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | अनुपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | प्रा. (सी.ए.) डॉ. रवींद्र प्रभाकर बांबर्डेकर ( प्रभारी वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली**

**लक्ष्मीनारायण रामदास**

भारतीय नौदलाचे माजी प्रमुख ॲडमिरल (निवृत्त) लक्ष्मीनारायण रामदास यांचे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ९१ वर्षाचे होते.

**वसंत ढवण**

महाराष्ट्राचे ज्येष्ठ राष्ट्रीय कबड्डी खेळाडू वसंत ढवण यांचे दिनांक १९ मार्च, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षाचे होते.

**नर्गिस अंतुले**

राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या पत्नी नर्गिस अंतुले यांचे दिनांक २१ मार्च, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षाच्या होत्या.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| **बाब क्र.** | **व्यवस्थापन परिषदेची बाब** | **विभाग** |
|---|---|---|
| १ | दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाविद्यालयांकडून नवीन अभ्यासक्रम / विद्याशाखा / विषय/ अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता एकूण १२३ प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे आणि सॅटेलाईट केंद्र सुरु करण्याकरिता एकूण ०२ प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे तज्ञ समिती अहवाल, अधिष्ठाता मंडळाच्या ठरावानुसार व मा. कुलगुरू महोदयांच्या निर्णय मा. व्यवस्थापन परिषदेपुढे शासनाकडे शिफारशीसाठी सादर करण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाविद्यालयांकडून नवीन अभ्यासक्रम / विद्याशाखा / विषय/ अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता एकूण १२३ प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे आणि सॅटेलाईट केंद्र सुरु करण्याकरिता एकूण ०२ प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे तज्ञ समिती अहवाल, अधिष्ठाता मंडळाचा निर्णय व मा. कुलगुरुंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन नवीन अभ्यासक्रम / विद्याशाखा / विषय/ अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता एकूण प्राप्त **१२३** प्रस्तावांपैकी **१३** प्रस्ताव पात्र , तसेच सॅटेलाईट केंद्र सुरु करण्याकरिता एकूण प्राप्त **२ प्रस्ताव अपात्र** करण्यात आले आहेत. शासन निर्णयानुसार **परिशिष्ट 'अ'** शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली. | |
| ३ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये जलदगती पद्धतीने मंजुरी मिळालेल्या अतिरिक्त तुकड्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नियमित करण्यासाठी तज्ञ समितींचे अहवाल अधिष्ठाता | महाविद्यालय संलग्नता व |

| | | |
|---|---|---|
| | मंडळाच्या शिफारशीसह व्यस्थापन परिषदेपुढे शासनाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यासाठी ठेवण्यात येत आहे. | विकास विभाग |
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला की शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये जलदगती पद्धतीने मंजुरी मिळालेल्या अतिरिक्त तुकड्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नियमित करण्यासाठी तज्ञ समितींचे अहवाल अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशीसह व्यस्थापन परिषदेने मान्य केले, परंतु अनु क्रमांक एक असलेल्या प्रस्तावाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांच्या मान्यतेच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली. | |
| ४ | कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई [Late Narayan Meghaji Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] ऐवजी ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था मुंबई [N.M. Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] करण्यास मान्यता मिळावी आणि विद्यापीठाच्या अभिलेखामध्ये महाविद्यालयाच्या यादीमध्ये बदल करण्यास परवानगी मिळावी असा बदल केल्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे शिफारशींकरिता सादर करण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला कि, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई [Late Narayan Meghaji Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] ऐवजी ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था मुंबई [N.M. Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>२) एल. आय. सी. निकष लागू करणे.<br>३) अफिलेशन शुल्क व इतर शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>४) प्राचार्य, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना नियमित पगार दिल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>५) महाविद्यालयाचे नॅक मुल्याकंन करून घेण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.<br>६) सी.डी.सी. स्थापन केल्याबद्दल माहिती/पूर्तता घेण्यात यावी.<br>७) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे .<br>८) रिसर्च सेंटर व तत्सम संबंधी शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>९) अकॅडमिक ऑडिट पोर्टल वर माहिती भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. | |
| ५ | 1. Approve the Minutes of Building and Works Committee dated 07th March 2024.<br>2. Grant the permission to place the Minutes of Building and Works Committee dated 07th March 2024 before Management Council. | Infrastructure Planning, Execution and Maintenance Department |
| ठराव | बिल्डिंग वर्क्स कमिटीच्या दिनांक ७ मार्च २०२४ रोजीच्या बाब क्रमांक १,२,३,४,८ मान्य | |

| | | |
|---|---|---|
| ठराव | बिल्डिंग वर्क्स कमिटीच्या दिनांक ७ मार्च २०२४ रोजीच्या बाब क्रमांक १,२,३,४,५,७,८ व ११ मान्य करण्यात आले. बाब क्रमांक ९ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी सुचविलेल्या सूचना समाविष्ट करून सदर प्रस्ताव पुन्हा बिल्डिंग वर्क समितीपुढे मंजुरी साठी ठेवण्यात यावा.<br>तसेच बाब क्रमांक ६ मध्ये (पृष्ठ क्रमांक:१०) मधील खालील बाब वगळून मान्य करण्यात आली.<br>"Repair Lift of Thane Sub Campus & Annual Maintenance contract of same Lift installed by M/s Schindler India Pvt Ltd University of Mumbai"<br>आणि बाब क्रमांक १० मागे घेण्यात आली, असे सर्वानुमते मान्य करण्यात आले. | |
| ६ | निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड याना दिनांक २७ डिसेंबर, २०२३ ते २६ मार्च २०२४ पर्यंत मुदत वाढदेण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड याना दिनांक २७ डिसेंबर, २०२३ ते २६ मार्च २०२४ पर्यंत मुदत वाढ देण्याबाबतची बाब सर्वानुमते मान्य करण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

Baliram

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू